# कृषि तंत्र विद्यालय

(डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला)
सेलसुरा तह. जि. वर्धा (महा.)

डॉ. जीवन आर. कतोरे
प्राचार्य

भ्रमणध्वनी क्रं. ९९७००७०९४४
atsselsura@gmail.com


**कृषि तंत्र विद्यालय, सेलसुरा जि. वर्धा येथील जडवस्तुसाठा संग्रह याचा जाहीर लिलाव करणेबाबत**

कृषि तंत्र विद्यालय, सेलसुरा जि. वर्धा येथील प्रक्षेत्रावरील व विद्यालयातील निरुपयोगी जडवस्तुसंग्रह साठा (लोखंडी / प्लॅस्टीक वस्तु) यांचा जाहीर लिलाव दि. ..... 21/०८/२०२५ रोजी 11:00 वाजता करण्याचे योजिले आहे. जाहीर लिलावात समाविष्ठ वस्तु कार्यालयीन वेळेत ईच्छुकांना पाहता येईल. जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती सोबत जोडण्यात आलेल्या आहेत.

प्राचार्य,
कृषि तंत्र विद्यालय,
सेलसुरा जि. वर्धा

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## कृषि तंत्र विद्यालय, सेलसुरा जि. वर्धा येथिल जडवस्तुंच्या जाहीर लिलावाच्या नियम व अटी

दि. २१/०८/२०२५ रोजी सकाळी १२.०० वाजता कृषि तंत्र विद्यालय, सेलसुरा जि. वर्धा येथे जडवस्तुंचा जाहीर लिलाव करण्यात येत आहे.

जडवस्तुंच्या लिलावाकरीता नियुक्त अधिकारी जडवस्तुंचा लिलाव करतील. लिलाव सुरु करण्यापुर्वी जडवस्तु दाखविण्यात येईल तसेच लिलावाच्या अटी समजावुन सांगतील.

१. लिलावात बोली बोलणाऱ्याला सुरुवातील रु. ५०००/– (रु. पाच हजार फक्त) अनामत रक्कम म्हणुन जमा करावी लागेल. कोणत्याही व्यक्तीस अनामत रक्कम भरल्याशिवाय लिलावामध्ये बोली बोलण्यास परवानगी देण्यात येणार नाही. सर्वाची बोली पुर्ण झाल्यास व त्याने जडवस्तु घेण्यास नकार दिल्यास सदर अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२. लिलावात जडवस्तु घेण्याची अनामत रक्कम सर्वाची बोली झाल्यानंतर बोली धारकाने जडवस्तुची संपुर्ण रक्कम भरल्यानंतर परत करण्यात येईल. त्याचप्रमाणे अयशस्वी बोली बोलणाऱ्याची अनामत रक्कम लिलाव संपल्यानंतर परत करण्यात येईल.

३. बोली बोलतांना बोलीची रक्कम कमीत कमी रु. १०००/– रुपयांनी वाढवावी लागेल. लिलावाची बोली पुर्ण झाल्यावर सर्वात जास्त बोली बोलणाऱ्याचे नांव जाहीर करुन लिलावाची प्रक्रीया पुर्ण करण्यात येईल.

४. ज्या व्यक्तीस बोली मंजुर झाली, त्या व्यक्तीस मंजुर झालेल्या बोलीच्या किंमती एवढी पुर्ण रक्कम त्वरीत रोखीने अदा करावी लागेल. लिलावात खरेदी केलेल्या जडवस्तुंची पूर्ण किंमत भरुन संबंधीत बोली धारकांना सदर जडवस्तु ताबडतोब स्वतःच्या ताब्यात घ्यावी लागेल व स्वखर्चाने न्यावे लागेल. सदर जडवस्तुची कोणतीही जबाबदारी विभागाच्या लिलाव समितीची राहणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी मंजुर बोलीधारकाची राहील. बोली धारकाने खरेदी केलेली जडवस्तु ताबडतोब ताब्यात न घेतल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधीत जडवस्तुंच्या समिती मार्फत पुन्हा लिलाव करण्यात येईल.

५. लिलावातील जास्तीत जास्त बोली स्वीकृत करणे अथवा न करणे तसेच अपेक्षेपेक्षा बोली कमी असल्यास संबंधीत जडवस्तु देण्याचा अथवा न देण्याचा सर्व अधिकार लिलाव समितीस राहील. त्याशिवाय लिलावात ईतर बाबतीत लिलाव समिती अधिकाऱ्यांचाच निर्णय अखेरचा व बंधनकारक राहील.

६. एकदा लिलावात विकत घेतलेले जडवस्तु कोणत्याही कारणाने परत घेतल्या जाणार नाही. संबंधीत बोली धारकाने जडवस्तुचा ताबा न घेतल्यास अनामत रक्कम जप्त करुन विद्यापीठात जमा करण्यात येईल.

७. जडवस्तुंचा लिलाव प्रत्येकाच्या बाबतीत एकत्रित, वेगवेगळा अथवा गटागटाने करणे हे लिलाव समितीच्या मर्जीवर अवलंबुन राहील.

८. लिलाव पुर्ण करण्याचा निर्णय तसेच कोणतेही कारण न दाखवता लिलाव रद्य/स्थगीत करण्याचा अधिकार लिलाव समितीस राहील. लिलाव समितीने दिलेल्या निर्णयावर कोणतीही अपील करता येणार नाही. बोली धारकांना ही लिलाव अखेरचा व बंधनकारक राहील.

९. लिलाव समितीच्या कामकाजामध्ये अडथळा आणणे, आरडाओरड करणे किंवा दखल देणाऱ्यास लिलावातुन बाद करण्यात येईल व त्याची अनामत रक्कम सुध्दा जप्त करण्यात येईल.

१०. लिलावात विकत घेतलेले जडवस्तु बोली धारकाने २४ तासाच्या आत न नेल्यास रु. २०००/–प्रति दिवस दंड आकारण्यात येईल. दंडाची रक्कम न भरल्यास सदरहु बोली धारकाची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१२. नाव नोंदणी व अनामत रक्कम भरण्याची वेळ सकाळी १०.०० ते १२.०० वाजेपर्यंत राहील.

१३. लिलावाचे स्थळ – कृषि तंत्र विद्यालय, सेलसुरा जि. वर्धा

प्राचार्य,
कृषि तंत्र विद्यालय,
सेलसुरा जि. वर्धा